प्रसिद्धी पत्रक
PRESS NOTE

CITY & INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LTD.
**Regd. Office:** Nirmal, 2nd Floor, Nariman Point, Mumbai 400 021. Tel.: 91-22-6650 0900; FAX:91-22-6650 0933; www.cidcoindia.com
**Head Office:** CIDCO Bhavan, CBD Belapur, Navi Mumbai 400 614. Tel.: 91-22-6791 8241; Fax: 91-22-6791 8294; email: ratambepriya@gmail.com

**दि. ०७.०७.२०२०**

**कोरोनाविरुद्धच्या लढ्यातले आपण सारे सैनिक - श्री. उद्धव ठाकरे**

"कोरोना विरुद्धच्या लढ्यामध्ये उतरून स्वत:चा जीव धोक्यात घालून अहोरात्र रुग्णसेवा करणाऱ्या सैनिकांचा आपल्याला सार्थ अभिमान असून, या योद्ध्यांच्या बळावरच कोरोनाविरुद्धची लढाई आपण निश्चितच जिंकणार आहोत", असे उद्गार **श्री. उद्धव ठाकरे**, माननीय मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी काढले. सिडको महामंडळातर्फे मुंबई महानगरपालिकेकरिता मुलुंड येथील रिचर्डसन क्रुडास कंपनीच्या आवारामध्ये उभारण्यात आलेल्या कोविड-१९ समर्पित रुग्णालयाचे ई-लोकार्पण मुख्यमंत्र्यांच्या शुभहस्ते दि. ७ जुलै, २०२० रोजी करण्यात आले, त्या प्रसंगी ते बोलत होते. सदर ई-लोकार्पण सोहळा व्हीडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे पार पडला.

या प्रसंगी **श्री. आदित्य ठाकरे**, मंत्री पर्यटन, पर्यावरण, राजशिष्टाचार, महाराष्ट्र राज्य, **श्री. अस्लम शेख**, पालक मंत्री, मुंबई, **श्री. लोकेश चंद्र**, उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको, **श्री. इकबाल सिंग चहल**, आयुक्त, मुंबई महानगरपालिका, **श्री. अश्विन मुद्गल,** सहव्यवस्थापकीय संचालक, सिडको, **श्री. आर. बी. धायटकर**, मुख्य अभियंता, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, सिडको, **डॉ. बी. एस. बावस्कर,** मुख्य आरोग्य अधिकारी, सिडको व सिडकोचे इतर अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

"सिडकोतर्फे अत्यंत अल्प काळात व युद्ध पातळीवर उभारण्यात आलेले हे रुग्णालय दर्जाच्या बाबतीत उत्तम असून कोरोना विरुद्धच्या आपल्या लढ्याची इतिहास निश्चितच नोंद घेईल, असेही मुख्यमंत्री यावेळी म्हणाले."

कोविड-१९ विषाणूचा संभाव्य प्रादुर्भाव लक्षात घेऊन मुख्यमंत्र्यांनी सुरूवातीच्या टप्प्यातच कोविड रुग्णांकरिता अद्ययावत रुग्णालय उभारण्याचे निर्देश दिले व त्याप्रमाणे सिडकोतर्फे अल्प काळात सदर रुग्णालय उभारण्यात आल्याचे **श्री. लोकेश चंद्र**, उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको यांनी या वेळी बोलताना सांगितले. सर्वसामान्य नागरिकांनादेखील सहजतेने या

कोविड सेंटरच्या माध्यमातून उपचार प्राप्त होणार आहे. त्याचप्रमाणे रुग्णालयामध्ये उपलब्ध करून देण्यात आलेल्या सोयी सुविधांचा आढावा घेतानाच हे रुग्णालय मुंबई महानगरपालिकेच्या कोरोना विरुद्धच्या लढ्यात उपयुक्त ठरेल, असा विश्वासही श्री. लोकश चंद्र यांनी यावेळी व्यक्त केला.

मुंबई महानगरातील कोरोनाचा वाढता प्रादुर्भाव रोखण्यासाठी व रुग्णांवर उपचार करण्यासाठी मुंबईत ठिकठिकाणी अत्याधुनिक आरोग्य केंद्रे असावीत, या उद्देशाने महाराष्ट्र शासनाने दिलेल्या निर्देशांनुसार सिडकोतर्फे मुंबईतील मुलुंड येथील रिचर्डसन क्रुडास कंपनीच्या आवारात कोविड-१९ बाधित रुग्णांवर उपचारासाठी सदर अद्ययावत व सुसज्ज रुग्णालय उभारण्यात आले आहे. १६५० खाटांच्या या रुग्णालयामध्ये कॉन्टॅक्टलेस क्लिनिक, संपूर्ण वातानुकूलित हँगर, पेशन्ट आणि मेडिकल स्टाफसाठी स्वतंत्र एन्ट्री व एक्झिट, ९५२ ऑक्सिजन बेड, रुग्णांसाठी पिण्याचे शुद्ध व गरम पाणी, वायफाय अशा अत्याधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

कोविडच्या गंभीर रुग्णांसाठी ऑक्सिजनची आवश्यकता लक्षात घेऊन २६,००० लीटर ऑक्सिजन टँकची व्यवस्थाही इथे करण्यात आली आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणावर ऑक्सिजनची सोय असलेले हे एकमेव कोविड सेंटर सिडकोतर्फे उभारण्यात आले आहे. तसेच रुग्णांचे व्यवस्थापन करण्यासाठी आयटी सुविधा व इंटरनेट, सीसीटीव्ही मॉनिटरींग, पीए सिस्टीम, सुरक्षा व्यवस्था, अद्ययावत वैद्यकीय उपकरणे या सुविधाही उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. मुंबई महानगरपालिकेच्या आवश्यकतेनुसार व नियमावलीनुसार सदर रुग्णालय विकसित करण्यात आले आहे.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

मा. संपादक महोदय,
वरील बातमीस आपल्या लोकप्रिय वर्तमानपत्रातून ठळक प्रसिद्धि देऊन उपकृत करावे, ही विनंती.

**जनसंपर्क विभाग, सिडको**